**बिनशेती झालेल्या गटातील परवानगी देण्यात आलेल्या मंजूर अभिन्यासातील खुल्या जागांबाबत निर्देश...........**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः रिट यचिका-२०१८/प्र.क्र. ३१/ज-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : ०५ सप्टेंबर, २०१८**

वाचा:-

१) शासन परिपत्रक क्रमांक: जमीन ०१/२००६/प्र.क्र.१२/ज-१ दि. २५.०५.२००७

२) नगर विकास विभाग अधिसूचना क्र, टिपीएस-१८१२/१५७/सी.आर-७१/१२/ आरईसी क्र. ३४/१२/आरपी/नवि-१३ दि. २१.११.२०१३

**प्रस्तावना :**

बिनशेती झालेल्या गटातील परवानगी देण्यात आलेल्या मंजूर अभिन्यासातील खुली जागा,व्यक्ती व संस्थांना वितरण करण्याबाबत संदर्भाधीन क्र. १ येथे नमूद शासन परिपत्रक दि. २५.०५.२००७ अन्वये शासनाने पुढीलप्रमाणे निर्देश दिले होते:-

*"अ-नागरी ( Non-Urban) भागातील किंवा ग्रामीण भागातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीत येत नसलेल्या जमिनींच्या मंजूर अभिन्यासातील (Sanctioned lay-out) खुली जागा, रस्ते, इत्यादी सार्वजनिक उपयोगासाठी विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र अद्यापी खाजगी व्यक्तींच्या नावावर अभिलिखित असल्यास असे क्षेत्र सरकारजमा करण्यात यावे. असे क्षेत्र सरकारजमा केलेनंतर कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन व इतर हक्कात "Layout open space" किंवा "Layout Road Spaces" असे शेरे घेण्यात यावेत. तथापि, या जागा शासनाकडून विकसीत केल्या जाणार नाहीत. भविष्यात जेव्हा नगर पालिकेची /महानगरपालिकांची हद्दवाढ होईल किंवा सदर जमीन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत समाविष्ट होईल तेव्हा सदरील जागा प्रचलित धोरणानुसार जिल्हाधिकारी यांनी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडे वर्ग करण्याची कार्यवाही करावी."*



Scanned with OKEN Scanner

०२. मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ येथे शासन परिपत्रक दि.२५.०५.२००७ रद्द करण्याची याचना करुन, रिट याचिका क्र. १३४१६/२०१६ दाखल करण्यात आली असून, याचिकेच्या सुनावणीअंती मा. उच्च न्यायालयाने दि.०७.०८.२०१८ रोजी आदेश पारित केलेले आहेत. तसेच, नगर विकास विभागाने राज्यातील संपूर्ण क्षेत्रासाठी प्रादेशिक योजना लागू करण्या संदर्भात उक्त नमूद दि. २१.११.२०१३ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेन्वये मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या परिच्छेद ***१३.३.२*** आणि ***१३.२.३.३*** मध्ये अभिन्यासातील खुली जागा व रस्त्यां संदर्भात स्वयंस्पष्ट तरतूद केलेली आहे. यास्तव, आता संदर्भाधीन अ. क्र. १ येथे नमूद शासन परिपत्रक दि. २५.०५.२००७ हे रद्द करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

यास्तव, क्षेत्रिय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना सुधारित दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक:-

उपरोक्त पार्श्वभूमीवर, क्षेत्रिय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना पुढील प्रमाणे नव्याने दिशानिर्देश देण्यात येत आहेत:-

(१) बिनशेती झालेल्या गटातील परवानगी देण्यात आलेल्या मंजूर अभिन्यासातील खुली जागा,व्यक्ती व संस्थांना वितरण करण्याबाबत संदर्भाधीन क्र. १ येथे नमूद या विभागाचे शासन परिपत्रक दि. २५.०५.२००७ हे या आदेशाव्दारे रद्द करण्यात येत आहे.

(२) अ-नागरी (Non -Urban) भागातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीत येत नसलेल्या जमिनींच्या मंजूर अभिन्यासातील (Sanctioned lay-out) "Layout open space" किंवा "Layout Road Spaces" यांच्याबाबत नगर विकास विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ येथे नमूद अधिसूचना दि. २१.११.२०१३ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.



Scanned with OKEN Scanner

**०२.** सदर परिपत्रक नगर विकास विभाग यांच्या अनौ. सं. ६३/२०१८ दि.०६.०८.२०१८ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०९०५१७३७५६१३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( सुनिल कोठेकर )**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
८) प्रधान सचिव, (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
१०) महालेखापाल (लेखापरीक्षा) (लेखा व अनुज्ञयेता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
११) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) सर्व विभागीय आयुक्त.
१३) सर्व जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी.
१४) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२.
१५) सहसचिव/ उप सचिव/(सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६) मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग,
१७) "ज" समूहातील सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मुंबई.
१८) निवड नस्ती (कार्यासन ज-१)

*****



Scanned with OKEN Scanner